# महात्मा गांधी जीवन परिचय कार्य आणि विचार

**अनुराधा संजय भारद्वाज**
संशोधक विद्यार्थीनी
banuradha42@gmail.com
Mob. 9404506328

**प्रस्तावना :**

मोहनदास करमचंद गांधी (ऑक्टोबर २ इ.स. १८६९) हे भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते आणि तत्वज्ञ होते. महात्मा गांधी या नावाने ते ओळखले जातात. अहिंसात्मक असहकार आंदोलनांनी गांधींनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. अहिंसात्मक मार्गांनी स्वातंत्र्य मिळवण्यासाठी त्यांनी संपूर्ण जगाला प्रेरीत केले. गांधी सविनय सत्याग्रहाच्या कल्पनेचे जनक होते. त्यांचा जन्मदिवस २ ऑक्टोबर हा भारतात गांधी जयंती म्हणून तर जगभरात आंतरराष्ट्रीय अंहिसा दिन म्हणून साजरा केला जातो.

असहकार आणि अंहिसेच्या तत्त्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधीनी प्रथम दक्षिण अफ्रिकेमध्ये, तेथील भारतीयांना त्यांचे नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. इ. स. १९१५ मध्ये भारतात परत आल्यावर त्यांनी चंपारणमधील शेतकऱ्यांना जुलुमी कर व जमीनदार यांच्याविरूध्द लढण्यासाठी एकत्र केले. इ.स. १९२१ मध्ये राष्ट्रीय काँग्रेसची सूत्रे सांभाळल्यानंतर गरिबी निर्मूलन, आर्थिक स्वावलंबन स्त्रियांचे समान हक्क, सर्व धर्म-समभाव, अस्पृश्यता निवारण आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वराज्य यासाठी देशभरात चळवळ चालू केली. महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने तीन राष्ट्र व्यापी चळवळी केल्या. या चळवळींनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. इ.स. १९२० ‘‘असहकार चळवळ‘‘ इ.स. १९३० ची ‘‘सविनय कायदेभंगाची चळवळ‘‘ इसवी सन १९४२ ची ‘‘चलो जाव चळवळ‘‘ या तीन चळवळी होत्या या चळवळीमूळे भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाले.

**संशोधनाची उदिष्टे :**

१. महात्मा गांधीच्या सामाजिक विचारांचा अभ्यास करणे.

२. महात्मा गांधीच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणे.

३. महात्मा गांधी यांच्या राजकीय विचारांचा अभ्यास करणे.

४. महात्मा गांधी यांच्या महिला व लोकशाही विषयक विचारांचा अभ्यास करणे.

५. महात्मा गांधी यांच्या अंहिसेविषयक विचारांचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती** :

प्रस्तुत संशोधनासाठी द्वितीय साधन सामुग्रीचा वापर करून माहिती संकलित केलेली आहे. तसेच वर्तमानपत्रे, मासिके, संदर्भग्रंथ, इंटरनेट इत्यादी माध्यमांचा आधार घेतला जाणार आहे.

**संशोधन विषय :**

सदर संशोधनासाठी महात्मा गांधी यांचे जीवन परिचय कार्य आणि विचार हा विषय निवडला आहे. यामध्ये महात्मा गांधीजींचे सामाजिक, आर्थिक, राजकीय, अंहिसा आणि महिला व लोकशाही विषयक विचारांचा अभ्यास केलेला आहे.

**महात्मा गांधी यांचे अहिंसेविषयी विचार :**

गांधीजींनी आपले आयुष्य सत्याच्या शोधासाठी अर्पण केले होते. त्यांचे आत्मचरित्र **'माझे सत्याचे प्रयोग'** या नावाखाली प्रसिध्द आहे. यामध्ये त्यांनी अंहिसेचे तत्त्वज्ञान मांडले आहे. ते म्हणतात, ''हिसेंच्या मार्गाने एखादी गोष्ट साध्य होते तेव्हा ते यश तात्पूरते असते. त्यामुळे होणारे नुकसान मात्र दिर्घकालीन असते'' ते स्वत:ही याच तत्त्वांनुसार जगले आणि इतरांनीही तसे करावे असे सुचवले.

**महात्मा गांधी यांचे महिलेंविषयक विचार :**

महात्मा गांधीजींनी त्या काळात महिला सशक्तीकरणावर जेवढा भर दिला आणि त्यांचे विचार जेवढे आधुनिक होते त्याचा आजच्या पिढीने अनुकरण करण्याची आजच्या काळाची गरज आहे. त्यांनी **'माझे सत्याचे प्रयोग'** त्यांच्या आत्मचरित्रात महिलांविषयी त्यांचे विचार आणि महिला सशक्तिकरणासाठी केलेल्या कार्याचा प्रत्यय येतो. ते म्हणतात.''पुरूष जेवढ्या वाईट कामासाठी जबाबदार आहे, त्यात सगळयात वाईट स्त्री जातीचा केला जाणारा दुरूपयोग आहे.'' आणि वास्तविकता आजही अशी आहे कि पुरूषांच्या मानसिकतेमध्ये कोणताही बदल झालेला दिसून येत नाही. ''पुरूषप्रधान मानसिकता असणाऱ्या समाजात आजही महिलांना गुलाम समजल्या जाते.'' महात्मा गांधीजींनी ९९ वर्षापुर्वी १५ सप्टेंबर १९२१ रोजी 'यंग इंडिया' मध्ये लिहिलेला लेख आजही खरा ठरतो.

**महात्मा गांधी यांचे सामाजिक आणि लोकशाही विषयक विचार :**

"एकीकडे खादी गरिबांकरिता भाकर कमवण्याचा एक सन्मानीय व्यवसाय आहे तर दुसरीकडे अहिंसक पद्धतीने स्वराज्य मिळवण्याचे ते एक अतिरिक्त व तुलनात्मक दृष्टीने अधिक मौल्यवान अस्त्रही आहे." या विचारातुन त्यांनी समाजाला अहिंसेची शिकवन तर दिलीच पण त्याच बरोबर त्यांनी समाजाला स्वदेशी, लोकशाही हिंद स्वराज्य, समानतेवर आधारित समाजाची स्थापना, खादी उद्योगांना प्रोत्साहन देऊन स्वदेशी उद्योगांना

प्रोत्साहीत करून स्वदेशी चळवळ उभी केली. समाजात लोकांमध्ये स्वदेशी ची भावना निर्माण करून ग्रोमोद्योगांना प्रोत्साहीत केले.

**महात्मा गांधी यांचे राजकिय विचार :**

महात्मा गांधी यांनी अहिंसेचे तत्त्व अवलंबून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले. त्यांनी लोकांना **"चला खेड्याकडे"** असे आव्हान केले. कारण "जर ग्रामीण भागाचा विकास झाला तरच देशाचा विकास होईल" असे त्यांचे मत होते. त्यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी आंदोलने, चळवळी, स्वदेशी, अहिंसा, सत्याग्रह केली आणि लोकांना अहिंसेच्या मार्गाने देखील स्वातंत्र्य मिळू शकते हे दाखवून देशातील लोकांना अहिंसेची शिकवन दिली. "तोडफोड, राष्ट्रीय संपत्तीचे नुकसान, रास्ता रोको यासारख्या कृतींना लोकशाहीत काहीही स्थान नाही. जो अशा कृतींना लोकशाहीत काहीही स्थान नाही. जो अशा कृतींना प्रोत्साहन देतो त्याला लोकशाहीब÷ल बोलण्याचा काहीही अधिकार नाही" असे त्यांचे मत होते.

**सारांश :**

१) महात्मा गांधींचे विचार राष्ट्र हिताचे असुन आजही काळाची गरज आहे.

२) महात्मा गांधींचे विचार भारतीयांना एकात्मतेची शिकवन देणारे आहेत.

३) अहिंसा, सर्वधर्मसमभाव, सत्य, स्वदेशी, स्वातंत्र्य या तत्त्वांचा त्यांनी पुरस्कार केला जे आजही लोकांना समतेची शिकवन देऊन जाते.

**संदर्भ ग्रंथ :**

१) महात्मा गांधी - विकिपीडीया

२) महाराष्ट्र टाईम्स

३) इनमराठी - नेट

४) गांधीदर्शन - प्र. रा. दामले

५) नवभारती टाईम्स

६) इंडिया टाईम्स